नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३५८ Issue - 358 | वार गुरुवार दि. २१ मे २०२६ Blow- Thursday Date 21 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या अफवा; राज्यात, देशात पुरेसा साठा

## अफवांवर विश्वास ठेवू नका; राज्यातील जनतेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या अफवा पसरत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. पॅनिक होऊन पेट्रोल-डिझेल खरेदी करू नका. राज्यात आणि देशात पुरेसा साठा उपलब्ध आहे. अफवांमुळेच पुरवठा साखळी विस्कळीत होण्याचा धोका निर्माण होतो, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुंबईत माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, केंद्र सरकारने वारंवार स्पष्ट केले आहे की देशाकडे पेट्रोल-डिझेलचा स्ट्रॅटेजिक साठा उपलब्ध आहे आणि पुरवठाही नियमित सुरू आहे. मात्र सोशल मीडियावर आणि विविध ठिकाणी तुटवड्याच्या अफवा पसरत असल्याने नागरिक घाबरून मोठ्या प्रमाणात इंधन खरेदी करत आहेत.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, पुरवठा साखळी ही अनेक वर्षांच्या वापराच्या अंदाजावर आधारित असते. एखाद्या तालुक्यात किंवा पेट्रोल पंपावर दररोज किती इंधनाची गरज असते, यानुसार पुरवठा केला जातो. पण अचानक लोकांनी जास्त प्रमाणात पेट्रोल-डिझेल भरायला सुरुवात केली, तर संपूर्ण साखळीवर ताण येतो.

फडणवीस यांनी यासाठी बँकेचं उदाहरण दिलं. ते म्हणाले, जर एका दिवशी सर्व लोकांनी बँकेत जाऊन पैसे काढायला सुरुवात केली, तर बँकेवर अचानक ताण येतो. याचा अर्थ बँकेकडे पैसे नाहीत असा होत नाही. तशीच परिस्थिती पेट्रोल-डिझेल पुरवठ्याची आहे.

जागतिक परिस्थिती सध्या तणावपूर्ण असली, तरी भारताने आपली पुरवठा व्यवस्था सक्षम ठेवली आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊन अतिरिक्त इंधन खरेदी करू नये. अफवांवर विश्वास ठेवू नये आणि इंधनाचा वापरही जबाबदारीने करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

दरम्यान, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनीदेखील नागरिकांना दिलासा देत राज्यात किमान एक महिन्याचा पेट्रोल-डिझेल साठा उपलब्ध असल्याचे सांगितले. हा प्रश्न केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही. अमेरिका-इराण तणावामुळे जागतिक स्तरावर पुरवठा साखळीवर परिणाम होत आहे. मात्र राज्यात कोणतीही तातडीची कमतरता नाही, असे भुजबळ यांनी स्पष्ट केले.

सध्या काही शहरांमध्ये पेट्रोल पंपांवर वाहनांच्या रांगा दिसत असल्या, तरी प्रशासनाने नागरिकांना शांत राहण्याचे आणि अफवांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.

# शेतकरी कर्जमाफी ३० जूनपूर्वी मिळणार : ना. दत्तात्रय भरणे

वित्तीय नियोजनाचा आढावा घेऊन लवकरच निर्णय : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई : राज्यात विधान परिषदेच्या निवडणुका जाहीर झाल्यामुळे लागू झालेल्या आचारसंहितेचा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर कोणताही परिणाम होणार नसून, येत्या ३० जूनपूर्वी राज्यातील बळीराजासाठी कर्जमाफीची अधिकृत घोषणा केली जाईल, अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बुधवार दिली. कर्जमाफी हा सरकारचा पूर्वनियोजित धोरणात्मक निर्णय असल्याने या प्रक्रियेत आचारसंहितेचा कोणताही कायदेशीर अडथळा येणार नाही. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अत्यंत सकारात्मक असून, वित्तीय नियोजनाचा आढावा घेऊन लवकरच अंतिम निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

जून महिन्यात राज्यातील मुख्य खरीप हंगामाच्या पेरण्यांना सुरुवात होते. या काळात शेतकऱ्यांना बियाणे, खते आणि इतर शेतीकामांसाठी नव्या पीक कर्जाची आवश्यकता असते. परंतु, जुन्या कर्जाच्या बोज्यामुळे अनेक शेतकरी बँकांच्या दारात थकबाकीदार ठरले आहेत. हीच अडचण ओळखून सरकारने खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच म्हणजेच ३० जूनपूर्वी कर्जमाफीची अंमलबजावणी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना बँकांकडून पुन्हा नवीन पीक कर्ज मिळणे सुलभ होईल, असे मंत्री भरणे यांनी सांगितले.

# भूमी अभिलेख विभागाचा; राज्यात ५० नवी कार्यालये सुरु होणार; १० हजार पदांच्या आकृतीबंधालाही मूर्तरूप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रशासकीय कामकाज लोकाभिमुख आणि वेगवान करण्यासाठी, भूमी अभिलेख विभागाच्या सुधारित आकृतीबंधानुसार नव्याने ५० कार्यालये निर्माण करण्यात आली असून, १० हजार ६८३ पदांच्या आकृतीबंधाला मूर्तरूप देण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय आणि आदेश बुधवारी प्रसिद्ध करण्यात आला.

महसूल विभागाच्या अधिपत्याखालील भूमी अभिलेख विभागातील कामकाजाचा वाढता व्याप लक्षात घेऊन शासनाने ११ मार्च २०२६ रोजी १० हजार ६८३ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मंजुरी दिली होती. या अंतर्गत राज्यभरात अनेक नवीन कार्यालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली होती. आता या नव्या कार्यालयांना मूर्त रूप देत त्यांचे प्रशासकीय कार्यक्षेत्र आणि मुख्यालयाचे ठिकाण निश्चित करण्यात आले आहे.

या शासन निर्णयानुसार राज्यात उप संचालक भूमी अभिलेख यांचे १ नवीन कार्यालय, तर जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांची ८, नगर भूमापन अधिकाऱ्यांची २३ तर विशेष उप अधीक्षक भूमी अभिलेख यांची १७ नवीन कार्यालये स्थापन केली जाणार आहेत.

१. उप संचालक, भूमी अभिलेख (१ नवीन कार्यालय) : नांदेड २. जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख (८ नवीन कार्यालये) : नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, अहिल्यानगर (अहमदनगर), नाशिक, पुणे, रायगड ३. नगर भूमापन अधिकारी (२३ नवीन कार्यालये) : पुणे, नागपूर, ठाणे (कल्याण, डोंबिवली, मिरा-भाईंदर), पालघर (वसई, विरार), रायगड (अलिबाग), नाशिक (मालेगाव), अहिल्यानगर, सातारा (कराड), छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, लातूर, बीड, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा आणि चंद्रपूर ४) विशेष उप अधीक्षक भूमी अभिलेख तथा चौकशी अधिकारी (१७ नवीन कार्यालये) ५) गावठाण, शहर मापन आणि नगर भूमापन या कामकाजासाठी नवीन १७ कार्यालये (५ शहर मापन/गावठाण आणि १२ चौकशी अधिकारी) राज्यात शहरीकरण आणि ग्रामीण भागातील गावठाण विस्ताराचा वेग वाढला आहे. (पान २ वर...)

# वांद्रे स्टेशन परिसरात अतिक्रमण हटवताना दगडफेक; ४ पोलीस, ६ आंदोलक जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वांद्रे पूर्वेकडील बेहरामपाडा परिसरात रेल्वेच्या जागेवरील अतिक्रमण हटवण्याच्या कारवाईदरम्यान मंगळवारी रात्री तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. पश्चिम रेल्वेकडून सुरू असलेल्या कारवाईला स्थानिकांकडून विरोध करण्यात आला. यावेळी जमावाकडून दगडफेक करण्यात आल्याने ४ पोलीस कर्मचारी आणि ६ आंदोलक जखमी झाले.



हीघटनावांद्रेटर्मिनसजवळील गरीब नगर परिसरात घडली. अतिक्रमण हटवण्यासाठी रेल्वे प्रशासन आणि पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले होते. कारवाईदरम्यान अचानक काही नागरिक आक्रमक झाले आणि त्यांनी दगडफेक सुरू केली. त्यामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. जखमींना तातडीने भाभा रुग्णालय आणि व्ही. एन. देसाई रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. बहुतांश जखमींना रुग्णालयातून घरी पाठवण्यात आले असून एका आंदोलकाची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

घटनेनंतर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

## न्यूक्लिअर एनर्जी इन्स्टिट्यूट आणि युएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशीप फोरमच्या बैठक

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

# अणुऊर्जा क्षेत्रात महाराष्ट्र नेतृत्वासाठी सज्ज; अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, दि. २० : कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर, सेमीकंडक्टर, हरित हायड्रोजन, इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि प्रगत उत्पादन क्षेत्रामुळे आगामी काळात स्थिर व अखंड वीजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. केवळ सौर आणि पवन उर्जेवर दीर्घकालीन औद्योगिक विकास शक्य नसून अणुऊर्जा (न्यूक्लिअर पॉवर) ही भविष्यातील औद्योगिक अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची ठरणार आहे. महाराष्ट्र अणुऊर्जा क्षेत्रातील परिवर्तनाचे नेतृत्व करण्यास तयार असून अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

यूएस न्यूक्लिअर एक्झिक्यूटिव्ह मिशन इन इंडिया अंतर्गत आयोजित न्यूक्लिअर एनर्जी इन्स्टिट्यूट आणि युएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशीप फोरमच्या बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

बैठकीस ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अनबलगन, महाजनकोचे मुख्य कार्यकारी अधिकारी राधाकृष्णन बी., मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, राजशिष्टाचार विभागाचे सचिव राजेश गवांदे यांच्यासह अमेरिकेतील न्यूक्लिअर एनर्जी इन्स्टिट्यूटच्या अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मारिया ग्रेस कोर्सनिक, सेंट्रस एनर्जीचे उपाध्यक्ष डॅन लिस्टिको, क्लीन कोअर थोरियम एनर्जीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मेहुल शाह, न्यूक्लिअर कर्टिस-राइट कॉर्पोरेशनचे उपाध्यक्ष गॅरी वोल्स्की, यूएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरमच्या व्यवस्थापकीय संचालक निवेदिता मेहरा, एडलो इंटरनॅशनल कंपनीचे अध्यक्ष जॅक एडलो, तसेच होल्टेक एशियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि धोरणात्मक भागीदारी प्रमुख अनंत जैन यांच्यासह विविध अमेरिकन कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, जगभरात ऊर्जा संक्रमणाच्या प्रक्रियेत मोठे बदल होत आहेत. गेली अनेक वर्षे सौर आणि पवन ऊर्जा ही नवीकरणीय ऊर्जा हीच भविष्यातील ऊर्जा समस्या सोडवेल, अशी धारणा होती. मात्र आता वाढत्या औद्योगिकीकरणामुळे आणि डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे स्थिर व सातत्यपूर्ण वीज निर्मितीची गरज प्रकर्षाने जाणवत आहे. महाराष्ट्र सौर आणि पवन उर्जेत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत असला तरी कार्बनमुक्त आणि औद्योगिक स्तरावरील बेसलोड ऊर्जा पुरवठ्यासाठी




न्यूक्लिअर ऊर्जा अत्यावश्यक ठरणार आहे. महाराष्ट्र हा ६६० अब्ज डॉलर अर्थव्यवस्थेचा देशातील अग्रगण्य औद्योगिक राज्य असून भारतातील एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ४० टक्क्यांहून अधिक गुंतवणूक महाराष्ट्रात येते. मुंबई आणि नवी मुंबई परिसरात देशातील जवळपास ६० टक्के डेटा सेंटर क्षमता केंद्रित आहे. आगामी काळात सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता, लॉजिस्टिक्स आणि प्रगत उत्पादन क्षेत्रामुळे वीजेची मागणी अनेक पटींनी वाढणार आहे.

भारत-अमेरिका नागरी अणुऊर्जा सहकार्याबाबत गेल्या काही वर्षांत अनेक सकारात्मक बदल झाले असून खासगी क्षेत्राचा सहभाग, 'शांती' फ्रेमवर्कअंतर्गत सुधारणा, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि औद्योगिक सहकार्यामुळे नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. भारत हा आगामी अनेक दशकांत वेगाने वाढणारी वीज मागणी असलेला देश ठरणार असून महाराष्ट्र हा त्यातील सर्वात मोठा औद्योगिक घटक ठरणार आहे.

भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राच्या पुढील प्रवासात महाराष्ट्र केंद्रस्थानी ठरणार असून महाराष्ट्राला केवळ आयात केलेल्या अणुभट्ट्यांचा ग्राहक म्हणून नव्हे, तर न्यूक्लिअर उत्पादन, तंत्रज्ञान भागीदारी आणि जागतिक निर्यात केंद्र म्हणून विकसित करण्याचा निर्धार आहे. यासाठी राज्याकडे सक्षम औद्योगिक यंत्रणा, जागतिक दर्जाची बंदरे, लॉजिस्टिक सुविधा, तांत्रिक कौशल्य असलेले मनुष्यबळ, अभियांत्रिकी क्षमता आणि उद्योगपूरक धोरणे उपलब्ध असल्याचे श्री. फडणवीस यांनी नमूद केले.

अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात न्यूक्लिअर उत्पादन व प्रकल्प उभारणीसाठी पुढाकार घेतल्यास राज्य सरकारकडून औद्योगिक जमीन, पायाभूत सुविधा, कौशल्य विकास, संशोधन सहकार्य आणि उत्पादन क्लस्टर उभारणीसाठी मदत केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. सुरुवातीच्या टप्प्यातील उद्योगांसाठी अनुदान आणि विशेष सवलती देण्याची तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

छोट्या स्वरुपातील स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर्स (डचठ) क्षेत्रातही महाराष्ट्र प्रारंभीचे केंद्र बनण्यास उत्सुक असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. औद्योगिक अर्थव्यवस्थेच्या भविष्यातील गरजांशी एसएमआर तंत्रज्ञान सुसंगत असून पुढील पिढीच्या न्यूक्लिअर उर्जेसाठी महाराष्ट्र आदर्श प्रयोगभूमी ठरू शकतो, असे त्यांनी नमूद केले.

भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध आता तंत्रज्ञान, संरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पुरवठा साखळी या क्षेत्रांत अधिक मजबूत होत आहेत. नागरी अणुऊर्जा सहकार्य हे या भागीदारीच्या पुढील टप्प्यातील निर्णायक क्षेत्र ठरू शकते. न्यूक्लिअर ऊर्जा ही केवळ वीज निर्मिती नसून औद्योगिक स्पर्धात्मकता, तांत्रिक नेतृत्व, ऊर्जा सार्वभौमत्व, हवामान बदलाची जबाबदारी आणि दीर्घकालीन विश्वासाशी संबंधित विषय असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले. श्रीमती मारिया कोर्सनिक यांनी भारतामध्ये न्यूक्लिअर ऊर्जा क्षेत्रात मोठी संधी असल्याचे नमूद केले. महाराष्ट्रात कुशल मनुष्यबळ, औद्योगिक तंत्रज्ञान आणि सप्लाय चेन असल्याने येथे गुंतवणुकीची मोठी संधी असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी सादरीकरणाद्वारे राज्यातील वाढती ऊर्जेची गरज, सध्याची निर्मिती क्षमता आणि भविष्यात न्यूक्लिअर उर्जेची आवश्यकता याविषयी माहिती दिली. राज्यातील सध्याची वीज मागणी ३१ गिगावॅट असून २०३० पर्यंत ती ४२ गिगावॅटपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. राज्यात सौर ऊर्जा, बॅटरी स्टोरेज, हरित हायड्रोजन आणि ऊर्जा संक्रमणासाठी मोठ्या प्रमाणावर प्रकल्प राबविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्राने नूतनीकरणक्षम ऊर्जेत मोठी प्रगती केली असून २०३५ पर्यंत राज्याच्या ६५ टक्के ऊर्जेची गरज नूतनीकरणक्षम स्रोतांतून पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. भविष्यातील वाढती ऊर्जा गरज लक्षात घेता अणुऊर्जा हे राज्याचे पुढील महत्त्वाचे उद्दिष्ट असून त्यासाठी राज्याने तयारी सुरू केल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

महाजनकोचे व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी यांनी महाजनकोतर्फे सुरू असलेल्या विविध ऊर्जा प्रकल्पांचा आढावा सादर केला. पुढील दोन दशकांत ७ हजार मेगावॅट अणुऊर्जा निर्मितीचे लक्ष्य निश्चित केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सध्या १४.५ गिगावॅट क्षमतेची देशातील सर्वात मोठी राज्य सरकारी वीजनिर्मिती कंपनी म्हणून महाजनको कार्यरत आहे. ऊर्जा क्षेत्रातील बदल लक्षात घेता कोळसा आधारित उत्पादनाऐवजी अणुऊर्जेवर भर दिला जात आहे. राज्यातील औद्योगिक परिसरांच्या गरजेनुसार स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर तंत्रज्ञानाचा वापर करण्याचाही विचार सुरू आहे. स्टील, सिमेंट, खत उद्योग आणि डेटा सेंटर्सना अशा प्रकल्पांमधून ऊर्जा पुरवली जाऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

यूएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरमच्या व्यवस्थापकीय संचालक निवेदिता मेहरा यांनी प्रास्ताविकात बैठकीची पार्श्वभूमी विशद केली.यावेळी उपस्थित मान्यवरांनी महाराष्ट्रातील अणुऊर्जा क्षेत्र, त्यातील सुविधा व गुंतवणुकीची संधी याविषयी मते मांडली.

## संपादकीय....

### महाराष्ट्राचे नेतृत्व

कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर, सेमीकंडक्टर, हरित हायड्रोजन, इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि प्रगत उत्पादन क्षेत्रामुळे आगामी काळात स्थिर व अखंड वीजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. केवळ सौर आणि पवन उर्जे वर दीर्घकालीन औद्योगिक विकास शक्य नसून अणुऊर्जा (न्यूक्लिअर पॉवर) ही भविष्यातील औद्योगिक अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची ठरणार आहे. महाराष्ट्र अणुऊर्जा क्षेत्रातील परिवर्तनाचे नेतृत्व करण्यास तयार आहे. जगभरात ऊर्जा संक्रमणाच्या प्रक्रियेत मोठे बदल होत आहेत. गेली अनेक वर्षे सौर आणि पवन ऊर्जा ही नवीकरणीय ऊर्जा हीच भविष्यातील ऊर्जा समस्या सोडवेल, अशी धारणा होती. मात्र आता वाढत्या औद्योगिकीकरणामुळे आणि डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे स्थिर व सातत्यपूर्ण वीज निर्मितीची गरज प्रकर्षाने जाणवत आहे. महाराष्ट्र सौर आणि पवन उर्जेत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत असला तरी कार्बनमुक्त आणि औद्योगिक स्तरावरील बेसलोड ऊर्जा पुरवठ्यासाठी न्यूक्लिअर ऊर्जा अत्यावश्यक ठरणार आहे. महाराष्ट्र हा ६६० अब्ज डॉलर अर्थव्यवस्थेचा देशातील अग्रगण्य औद्योगिक राज्य असून भारतातील एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ४० टक्क्यांहून अधिक गुंतवणूक महाराष्ट्रात येते. मुंबई आणि नवी मुंबई परिसरात देशातील जवळपास ६० टक्के डेटा सेंटर क्षमता केंद्रित आहे. आगामी काळात सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता, लॉजिस्टिक्स आणि प्रगत उत्पादन क्षेत्रामुळे वीजेची मागणी अनेक पटींनी वाढणार आहे. भारत-अमेरिका नागरी अणुऊर्जा सहकार्याबाबत गेल्या काही वर्षांत अनेक सकारात्मक बदल झाले असून खासगी क्षेत्राचा सहभाग, 'शांती' फ्रेमवर्कअंतर्गत सुधारणा, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि औद्योगिक सहकार्यामुळे नव्या संधी निर्माण झाल्या आहेत.

## भूमी अभिलेख विभागाचा; राज्यात ५० नवी कार्यालये सुरु होणार; १० हजार पदांच्या आकृतीबंधालाही मूर्तरूप

(पान १ वरून...) त्यामुळे मालमत्तांची मोजणी, नगर भूमापन, हद्द निश्चिती आणि चौकशीची कामे प्रलंबित राहू नयेत यासाठी संबंधित तालुक्यातील व शहरातील वाढता कामकाजाचा व्याप पाहून ही नवी कार्यालये आणि तेथील कर्मचारी निश्चित करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. यामुळे ही कामे आता अधिक वेगाने मार्गी लागतील.चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री, महाराष्ट्र

# संग्रहालय : स्मृती, संस्कृती आणि भविष्याचा जिवंत सेतू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इतिहास केवळ पुस्तकांच्या पानांत राहत नाही; तो वस्तूंमध्ये, अवशेषांत, शिल्पांत, चित्रांत, हस्तलिखितांत आणि विस्मृतीच्या उंबरठ्यावर उभ्या असंख्य स्मृतींमध्ये जिवंत असतो. एखाद्या राष्ट्राची ओळख त्याच्या वर्तमानाच्या झगमगाटाने जितकी ठरते, तितकीच ती त्याने आपल्या भूतकाळाशी राखलेल्या नात्यानेही ठरते. म्हणूनच संग्रहालय हे केवळ जुन्या वस्तू ठेवण्याचे दालन नाही; ते एका समाजाच्या स्मृतींचे घर असते. १८ मे रोजी साजरा होणारा जागतिक संग्रहालय दिन हा केवळ औपचारिक दिन नसून आपल्या सांस्कृतिक वारशाकडे नव्याने पाहण्याची संधी आहे. आजचा काळ वेगाचा आहे माहितीचा, तंत्रज्ञानाचा, बदलाचा आणि विस्मृतीचाही. रोज नवे घडते आणि कालचे सहज मागे पडते. या धावत्या जगात संग्रहालये आपल्याला थांबायला शिकवतात. ती सांगतात की भविष्य घडवायचे असेल, तर भूतकाळ समजून घ्यावा लागतो. कारण इतिहास हा केवळ कालक्रम नसतो; तो समाजाच्या आत्म्याचा आरसा असतो.

संग्रहालयात ठेवलेली प्रत्येक वस्तू निःशब्द असते; पण ती बोलत असते. एखादी मातीची मूर्ती, तांब्याचे भांडे, प्राचीन शस्त्र, जुन्या नाण्यांचा संच, एखाद्या राजाचा शिलालेख, एखाद्या क्रांतिकारकाचे पत्र किंवा एखाद्या संताचे हस्तलिखित या साऱ्या वस्तू काळाच्या पलीकडचा संवाद साधत असतात. त्या आपल्याला सांगतात की आपण कुठून आलो, कसे घडलो आणि आपल्या संस्कृतीने कोणते मूल्य जपले. दुर्दैवाने आपल्या समाजात संग्रहालयांकडे पाहण्याची दृष्टी अजूनही मर्यादित आहे. अनेकांसाठी संग्रहालय म्हणजे शाळेच्या सहलीत एकदा पाहायचे ठिकाण किंवा पर्यटनाच्या यादीतील एक औपचारिक टप्पा. पण प्रत्यक्षात संग्रहालय हे शिक्षणाचे, संवेदनशीलतेचे आणि नागरिकत्वाचे महत्त्वाचे विद्यापीठ आहे. तिथे इतिहास पाठ करून कळत नाही तर तो अनुभवून समजतो.

आपण डिजिटल युगात जगत आहोत. मोबाईलच्या स्क्रीनवर जग मावले आहे. माहिती एका क्लिकवर मिळते. पण माहिती आणि जाण यांत फरक असतो. इंटरनेट माहिती देते, संग्रहालय संदर्भ देते. स्क्रीनवर एखाद्या वस्तूचा फोटो दिसतो, पण संग्रहालयात त्या वस्तूची वेळ, संदर्भ, उपयोग आणि मानवी कथा दिसते. म्हणूनच संग्रहालये आज अप्रासंगिक नाहीत, उलट अधिक आवश्यक झाली आहेत. भारतीय संस्कृतीचा विचार केला, तर भारत देश जणू अनेक थरांनी घडलेली सभ्यता आहे. सिंधू संस्कृतीपासून ते आधुनिक स्वातंत्र्यलढ्यापर्यंतचा इतिहास येथे एकमेकांत गुंफलेला आहे. विविध भाषा, धर्म, पंथ, कला, स्थापत्य, लोकपरंपरा आणि सामाजिक चळवळी यांचा विलक्षण संगम येथे आढळतो. या विविधतेचे साक्षीदार म्हणजे आपली संग्रहालये. ती केवळ राजे-महाराजांचा इतिहास जपत नाहीत; ती सामान्य माणसाचेही जगणे नोंदवतात. मात्र, एक कठोर वास्तव स्वीकारावे लागेल. आपल्या अनेक संग्रहालयांची अवस्था समाधानकारक नाही. काही ठिकाणी धुळीने माखलेले अवशेष, अपुरी माहितीफलक, कालबाह्य मांडणी, तुटपुंज्या सुविधा आणि लोकांपर्यंत पोहोचण्यातली कमतरता दिसून येते. वारसा जपण्याची जबाबदारी केवळ सरकारची नाही; ती समाजाचीही आहे. शासन, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक या सर्वांनी मिळूनच ही जबाबदारी उचलली पाहिजे.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

आजच्या पिढीला इतिहासाशी जोडण्याचे आव्हान अधिक मोठे आहे. मुलांना भूतकाळ शिकवायचा असेल, तर तो जिवंतपणे दाखवावा लागेल. संग्रहालये ही त्यासाठी प्रभावी माध्यमे ठरू शकतात. शाळांमध्ये पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन संग्रहालयभेटीला शैक्षणिक प्रक्रियेचा भाग बनवले पाहिजे. कारण जे डोळ्यांनी पाहिले जाते, ते मनात अधिक काळ टिकते. संग्रहालयांचे महत्त्व केवळ सांस्कृतिक नाही तर ते सामाजिक आणि लोकशाहीदृष्ट्याही महत्त्वाचे आहे. इतिहासावर ज्याचा ताबा, भविष्याची दिशा अनेकदा त्याच्याकडे जाते. म्हणूनच वस्तुनिष्ठ, समावेशक आणि चिकित्सक इतिहासाची जपणूक अत्यावश्यक आहे. संग्रहालये समाजाला स्मरण करून देतात की इतिहास एकाच आवाजाचा नसतो; त्यात अनेक अनुभव, अनेक वेदना, अनेक विजय आणि अनेक संघर्ष सामावलेले असतात. विशेषतः आजच्या काळात, जेव्हा ओळखींच्या राजकारणातून इतिहासाचे अनेक अर्थ लावले जातात, तेव्हा संग्रहालयांची जबाबदारी अधिक वाढते. ती केवळ प्रदर्शनस्थळे नसून संवादाची जागा असली पाहिजेत. तिथे अभिमान असावा, पण अंधगौरव नसावा तर चिकित्सकता असावी, पण तुच्छताही नसावी. इतिहासाशी प्रामाणिक राहणे हीच संग्रहालयांची खरी प्रतिष्ठा आहे. नागपूर सारख्या शहरांमध्ये स्थानिक इतिहास, सामाजिक चळवळी, साहित्यिक वारसा, औद्योगिक परिवर्तन आणि लोकसंस्कृती यांचे दस्तऐवजीकरण अधिक व्यापकपणे व्हायला हवे. प्रत्येक प्रदेशाची स्वतःची स्मृती असते. त्या स्मृती हरवल्या, तर फक्त वस्तू हरवत नाहीत तर एक सामूहिक ओळख हरवते.

आज जगभर संग्रहालयांची संकल्पना बदलत आहे. ती केवळ वस्तूंचे दालन राहिलेली नाहीत. संवादात्मक प्रदर्शन, डिजिटल पुनर्निर्मिती, ध्वनी-दृश्य सादरीकरण, मुलांसाठी अनुभवात्मक शिक्षण आणि समुदायाचा सहभाग या माध्यमांतून संग्रहालये अधिक जिवंत होत आहेत. आपणही ही दिशा स्वीकारली पाहिजे. वारसा जपणे म्हणजे केवळ कुलूप लावणे नव्हे तर तो लोकांपर्यंत अर्थपूर्ण पद्धतीने पोहोचवणे होय. संग्रहालये अर्थव्यवस्थेशीही जोडलेली आहेत. सांस्कृतिक पर्यटन, स्थानिक रोजगार, हस्तकला, मार्गदर्शक सेवा, संशोधन आणि प्रकाशन अशा अनेक क्षेत्रांना संग्रहालये चालना देऊ शकतात. पण त्यासाठी संग्रहालयांकडे 'खर्च' म्हणून नव्हे, तर 'गुंतवणूक' म्हणून पाहावे लागेल. एक आणखी महत्त्वाचा मुद्दा म्हणजे लोकसंग्रहालयांचा. मोठ्या राष्ट्रीय संग्रहालयांइतकेच स्थानिक आणि लोकस्मृती जपणारी लहान संग्रहालयेही महत्त्वाची आहेत. एखाद्या गावातील जुनी शेतीची अवजारे, लोककलेचे नमुने, पारंपरिक वेशभूषा, ग्रामजीवनातील वस्तू हेही तितकेच मौल्यवान वारसासामान आहे. इतिहास फक्त राजवाड्यांत घडत नाही; तो चुलीपाशी, शेतात, बाजारात आणि लोकगीतांतही घडतो.

आजचा माणूस आधुनिकतेच्या मोहात अनेकदा मुळांपासून दूर जात आहे. प्रगती आवश्यक आहे; पण मुळे विसरून केलेली प्रगती अनेकदा रिकामी ठरते. संग्रहालये आपल्याला सांगतात बदल स्वीकारा, पण स्मृती हरवू देऊ नका. कारण ज्यांना आपला भूतकाळ ठाऊक नसतो, त्यांचे भविष्य अनेकदा उथळ ठरते. जागतिक संग्रहालय दिन हा केवळ शुभेच्छांचा दिवस नसावा; तो आत्मपरीक्षणाचा दिवस असावा. आपण आपल्या वारशाशी किती जोडलेले आहोत? मुलांना आपण इतिहासाशी कसे परिचित करून देतो? आपल्या शहरातील, गावातील स्मृती आपण जपतो का? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची ही वेळ आहे. आज गरज आहे ती संग्रहालयांना जिवंत करण्याची. तिथे फक्त वस्तू नसाव्यात; कथा असाव्यात. फक्त अवशेष नसावेत; संवाद असावा. फक्त स्मृती नसाव्यात; प्रेरणा असावी. कारण संग्रहालये भूतकाळाची समाधी नसतात; ती भविष्याच्या जाणिवेची पाळेमुळे असतात. ती आपल्याला शिकवतात की काळ पुढे जातो, पण मूल्ये टिकवावी लागतात. संस्कृती जपावी लागते. स्मृतींचे रक्षण करावे लागते. जागतिक संग्रहालय दिनाच्या निमित्ताने आपण हा संकल्प करू या, आपल्या इतिहासाचा अभिमान बाळगू, पण तो समजून घेऊन आपल्या वारशाचे जतन करू, पण तो लोकांपर्यंत पोहोचवून आणि आपल्या पुढच्या पिढ्यांना फक्त माहिती नव्हे, तर स्मृतींची जाण देऊ. कारण शेवटी, संग्रहालयातील एखादी शांत वस्तू कधीकधी संपूर्ण पिढीला विचार करायला भाग पाडते आणि तेव्हाच कळते भूतकाळ जपणे म्हणजे मागे जाणे नव्हे तर पुढे जाण्यासाठी स्वतःला ओळखणे होय.

## लातुर येथे आयोजित दूसऱ्या बौध्द साहित्य संमेलनामध्ये समाजभूषण पुरस्काराने अनिल हजारे यांना गौरविण्यात आले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : लातुर येथे दुसरे बौध्द साहित्य संमेलन १० मे २०२६ रोजी संपन्न झाले. या कार्यक्रमात सामाजिक व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. धाराशीव जिल्ह्यातील अनिल हजारे ग्रा प सदस्य हावरगाव व जिल्हा प्रमुख रिपब्लिकन सेना धाराशीव यांना त्यांनी गेल्या तीस वर्षांपासून केलेल्या सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल याची दखल घेऊन त्यांना लातूर येथील दुसर्या बौध्द साहित्य संमेलनामध्ये समाज भुषण हा पुरस्कार संमेलनाचे अध्यक्ष




डॉ प्रशांत गायकवाड यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या निस्वार्थ कामाचे फळ मिळाल्याचे दिसून आले. यावेळी स्वागत अध्यक्ष मा चंद्रकांत शिंदे, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा डॉ नारायण कांबळे, प्रमुख वक्ते मा डॉ गिरीश मोरे, मा अमित मेघावी,प्रा यु डी गायकवाड, प्रा डॉ लहू वाघमारे, संयोजक संपादक राजेंद्र कांबळे या वेळी उपस्थित होते. मा अनिल हजारे यांना पुढिल सामाजिक कामासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# पडघा बोरिवलीत गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारातून शिक्षण आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा प्रेरणादायी संदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा जवळील बोरिवली गाव शिक्षण, सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या नव्या आदर्शामुळे पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. बोरिवली पडघा येथील प्रसिद्ध सोहराब गुजर हॉल येथे एसएससी (दहावी) आणि एचएससी (बारावी) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मानार्थ भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रामपंचायत बोरिवली, माजी सरपंच सोहराब गुजर आणि ॲड. झियाद सोहराब गुजर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात मुस्लिम व बिगर-मुस्लिम विद्यार्थ्यांचा एकत्रित सन्मान करून सामाजिक ऐक्याचा सुंदर संदेश देण्यात आला.

या भव्य सोहळ्याचे आकर्षक आणि प्रभावी सूत्रसंचालन टेनिस क्रिकेट स्पर्धांमधील लोकप्रिय समालोचक सिद्दीक भाभे यांनी केले. आपल्या खास शैलीत, शायरी आणि विनोदी अंदाजातून त्यांनी संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले.





कार्यक्रमाला राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक आमदार शांताराम मोरे, भिवंडी पंचायत समितीचे माजी सभापती प्रकाश भोईर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (एनसीपी) भिवंडी ग्रामीणचे अध्यक्ष गणेश गुलवी तसेच अभियंता दुर्राज कामानकर (के. के.) उपस्थित होते.

याशिवाय पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक देशमुख आणि पोलीस अधिकारी रुपेश जाधव यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या यशाचे अभिनंदन केले.

बोरिवली ग्रामपंचायतीचे सरपंच अनवर अब्दुल पिंजारी आणि ग्रामपंचायत अधिकारी गणेश जाधव यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींना ट्रॉफी, सन्मानचिन्हे आणि इतर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी आमदार शांताराम मोरे यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, पालकांच्या त्यागाचे आणि शिक्षकांच्या योगदानाचे विशेष कौतुक केले. शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे सर्वात मोठे साधन आहे. विद्यार्थीच उद्याच्या प्रगत समाजाचे शिल्पकार आहेत, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे सर्व धर्मीय समाजघटकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. माजी सरपंच नदीम मुल्ला, शमून खोत तसेच ग्रामपंचायत सदस्य अकबर अब्दुल्ला खोत यांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. खुर्रम नाचण, साजिद खोत, अल्ताफ नाचण, सादात मुल्ला, वासिम जवरे, कैस बर्डी आणि अरफात हरे यांसारख्या स्थानिक तरुणांनी शिक्षण आणि भाईचाऱ्याची परंपरा कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमात तालुका व जिल्हा पातळीवर उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट निकालासाठी कोकण मुस्लिम एज्युकेशन सोसायटी संचालित पडघा बोरिवली हायस्कूलचाही गौरव करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका जवेरिया काजी यांचा ट्रॉफी, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

सोहराब गुजर हॉलमध्ये आयोजित या भव्य कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. संपूर्ण हॉल खचाखच भरल्याने परिसरातील शिक्षणाविषयी वाढती जागरूकता आणि सकारात्मक सामाजिक बदल अधोरेखित झाला.

हा कार्यक्रम केवळ गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारापुरता मर्यादित न राहता सामाजिक एकात्मता, शिक्षणाचा प्रसार आणि सर्वधर्मीय ऐक्याचा प्रेरणादायी संदेश देणारा ठरला. आयोजक सोहराब गुजर आणि ॲड. झियाद सोहराब गुजर यांच्या या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी ॲड. झियाद सोहराब गुजर यांनी सर्व मान्यवर, पालक, शिक्षक आणि नागरिकांचे आभार मानले. त्यानंतर उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

### शेतात नेवून हात पाय बांधून द्राक्षेच्या बागेतील लोखंडी पोलाला बांधून केली मारहाण

# तुगाव येथील बौद्ध तरुण भालचंद्र कांबळे यांच्यावर जातीयवादी गावगुंडांनी केला जीवघेणा हल्ला

वागदरी/एस. के. गायकवाड : येथून जवळच असेलल्या तुगाव ता. उमरगा येथील बौद्ध युवक भालचंद्र कांबळे यास हातपाय बांधून जातीयवादी गावगुंडानी जीवघेणा हल्ला करून केली मारहाण.



याबाबत प्राप्त माहिती अशी की, तुगाव येथील बौद्ध तरुण भालचंद्र कांबळे हा त्याच्या गावातील समाजमंदीरा समोर त्याच्या मित्रांसमवेत बोलत बसला असता त्याच्याच गावातील मुस्लिम समाजातील त्याचा मित्र चांद अमीर फकीर हा त्यास चल आपण जेवण करण्यासाठी बाहेर जावू म्हणून त्यास जळकोट जवळील एका खानावळीत घेऊन आला. ते दोघेजन जेवण करित असताना काही वेळाने त्याच्या गावातील गावागुंड रोहीत दिपक जोमदे व पंकज शंकर जोमदे हे पण त्या ठिकाणी आले.ते सर्वजन मिळून जेवण केले.त्यानंतर भालचंद्र कांबळे व चांद फकीर हे दोघेजन त्याच्या मोटार सायकल वर गावी तुगावकडे जाण्या करिता निघाले असता रोहीत जोमदे व पंकज जोमदे ह्या दोघानी त्याची मोटार सायकल आष्टामोड येथे आडवली व त्यास त्या दोघानी त्याच्या मोटार सायकल वर भालचंद्र कांबळे याना त्या दोघाच्या मध्ये बसवून बळजबरीने त्यास घेवून जावू लागले त्यावेळेस तो म्हणाला की मला घरी जायचे आहे मला जावू द्या म्हणत असताना देखील शेतात थोडंस काम आहे म्हणून त्यास शेतात घेवून गेले व तो गाडीवरून उतरत असतानाच रोहीत जोमदे यांनी भालचंद्र कांबळेच्या पाटीमागून दोन्ही हात धरून पकडले व महारड्या तुझी लायकी आहे का ? आमच्या समवेत बसायची, तु लय माजला आहेस तुझा आज माज जिरवतो असे म्हणून भालचंद्र याच्या कंबरेत व पाटोत लाता घालू लागला दरम्या भालचंद्र हा खाली पडल्यानंतर पंकज जोमदे हा त्याच्या जवळ असलेल्या चामड्याच्या बेल्टने मारण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यास द्राक्ष बागेतील लोखंडी पोलला भालचंद्र याचे हात पाय बांधून पंकज जोमदे रोहीत जोमदे चांद फकीर व गहिनीनाथ जोमदे या चौघानी काठी बेल्ट लाथा बुक्याने मारहाण करून गंभीर जखमी केले असता पिढीत बौद्ध तरुण भालचंद कांबळे हा मुरूम पोलीस ठाण्यात गेला असता संबधीत पोलीसांनी त्यास उपचार करण्यासाठी मुरूम येथील शारकीय उपजिल्हा रुग्णालयात उपचारा साठी दाखल करण्यात आले असून दिनांक १८ मे रोजी दुपारी ४.१० मि . वरील सर्व जातीयवादी गावगुंडावर गुन्हा रं नंबर १३४ / २६ नुसार कलम ११८ (१) ११५ (२) ३५२ ३५१ (२) ३ ( ५) ३ ( १) ी ३ ( १) (ड) ३ ( २) ीं नुसार अनुसूचीत जाती आणि अनुसुचीत जमाती आत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार मुरूम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून त्या चार अरोपी पैकी चांद अमीर फकीर यास अटक केली असून बाकी ३ मुख्य.अरोपी फरार असल्याचे समजते पुढील. अधिक तपास पोलीस अधिकारी सदाशिव शेलार उपविभागीय पोलीस अधिकारी उमरगा यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक पोलीस निरिक्षक संदीप दहीफळे, पोलीस उपनिरीक्षक राहूल पंतगे, आलूर बिटचे नागनाथ वाघमारे हे पुढील तपास करित आहेत.

सदर प्रकरणी पोलीस तपास हा अत्यंत संत गतीने होत असल्याचे जाणवत असून या घटनेतील सर्व आरोपींना तात्काळ अटक करावी अशी मागणी आंबेडकरी जनतेतून होत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मराठी आणि तेलुगू संस्कृतीला जोडणारा 'मराठीतून तेलुगू शिका' उपक्रम सोलापुरात यशस्वी!

## मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप; सोप्या नोट्स आणि 'डिजिटल होमवर्क'चे प्रशिक्षणार्थींकडून कौतुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : भाषेच्या भिंती ओलांडून दोन संस्कृतींना एकत्र आणण्याच्या उद्देशाने पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय आणि हृदय स्पर्श बहुउद्देशीय समाजसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मराठीतून शिका तेलुगू लिहायला आणि वाचायला' या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाचा सांगता व प्रमाणपत्र वाटप सोहळा रविवारी मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे उपाध्यक्ष श्री. देविदास गोटीपामूल, प्रमुख पाहुणे म्हणून प्रख्यात स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. माणिक अंबाजी गुर्रम, तर विशेष अतिथी म्हणून 'आधुनिक सारथी'चे संपादक श्री. श्रीनिवास बुरा तसेच वाचनालयाचे संचालक श्री. अशोक इंदापुरे आणि श्री अरविंद चिन्नी यांची उपस्थिती होती.

डॉ. माणिक गुर्रम यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, सोलापूर हे बहुभाषिक शहर असून अशा उपक्रमांमुळे समाजा-समाजातील संवाद वाढतो. भाषेचे ज्ञान हे केवळ संवादासाठी नाही, तर मनांना जोडण्यासाठी आवश्यक आहे. श्री. श्रीनिवास बुरा यांनी बदलत्या काळात दोन भाषांचे ज्ञान असणे हे प्रगतीसाठी कसे महत्त्वाचे आहे, यावर प्रकाश टाकला. श्री. अशोक इंदापुरे यांनी दोन्ही संस्थांच्या वतीने घेतलेल्या परिश्रमाची माहिती दिली. ते म्हणाले की, वाचनालय आणि हृदय स्पर्श संस्थेने घेतलेल्या मेहनतीमुळेच हा उपक्रम यशस्वी झाला असून, सोलापूरच्या सामाजिक आणि सांस्कृतिक ऐक्यासाठी हा एक मैलाचा दगड ठरेल.

या उपक्रमाचे मुख्य प्रशिक्षक श्री. काशिनाथ गंजी (सचिव, हृदय स्पर्श संस्था) यांनी चित्रपट दिग्दर्शनाच्या शैलीतून विद्यार्थ्यांना अत्यंत रंजक पद्धतीने तेलुगू भाषेची ओळख करून दिली. तर सहाय्यक शिक्षक आणि डाक विभागाचे कर्मचारी श्री. श्रीरंग रेगोटी यांनी तयार केलेल्या सोप्या 'स्टडी नोट्स' आणि व्हॉट्सपच्या माध्यमातून घेतलेला नियमित होमवर्क यामुळे मराठी भाषिक विद्यार्थ्यांना तेलुगू भाषा आत्मसात करणे सहज शक्य झाले.

या सोहळ्यात प्रशिक्षणार्थींच्या वतीने मनोगत व्यक्त करताना श्री. गोपीकृष्ण वड्डेपल्लीआणि श्री. बाबुराव म्हेत्रे यांनी म्हणाले की, प्रशिक्षक काशिनाथ गंजी सर आणि श्रीरंग रेगोटी सरांनी वर्गात शिकवताना जे बारकावे सांगितले, त्यामुळे तेलुगू सारखी समृद्ध भाषा शिकणे खूप सोपे झाले. विशेषतः अवघड जोडाक्षरे आणि उच्चार शास्त्र त्यांनी ज्या पद्धतीने समजावून सांगितले, ते कौतुकास्पद आहे. नोकरी-व्यवसाय सांभाळूनही केवळ या सुटसुटीत नियोजनामुळेच आम्हाला ही भाषा आत्मसात करता आली. महिला प्रशिक्षणार्थी सौ. सुजाता चिप्पा आणि सौ. अंजली शिरसी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, रेगोटी सरांनी बनवलेल्या सुटसुटीत नोट्स आणि नियमित डिजिटल होमवर्कमुळे घरबसल्या सराव करणे सोपे झाले. यामुळे आमचा दुसरी भाषा शिकण्याचा आत्मविश्वास वाढला आहे. तसेच अनेक प्रशिक्षणार्थींनी आपले मनोगत व्यक्त करताना, अवघ्या काही दिवसांत आम्हाला तेलगू लिहिता आणि वाचता येऊ लागल्याचा आनंद व्यक्त केला.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. श्री. गौरीशंकर दिकोंडा यांनी सर्वांचे आभार मानले. डॉ. अंजली शिरसी यांच्या वंदे मातरम् गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाचे कार्यकारी मंडळ आणि हृदय स्पर्श संस्थेच्या अध्यक्षा सौ नर्मदा गंजी, श्रीनिवास वंगारी, उमेश नक्का, सिद्धलिंगेश्वर विजापूरे, हरिदास पेंटा, सौ रमा इप्पनपल्ली यांनी परिश्रम घेतले. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे सोलापूरच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातून मोठे कौतुक होत आहे.



# सोलापूर जिल्ह्यात पेट्रोल डिझेलचा पुरेसा साठा-नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर दिनांक २० जिल्ह्यातील तीन प्रमुख कंपन्याक्ष्झउख,इझ्झउङ ,खजउङ यांच्याकडून नियमित पेट्रोल व डिझेल पुरवठा सुरू असून सात दिवसाचा साठा उपलब्ध आहे नागरिकांनी कोणतीही काळजी करू नये तसेच अफवांवर विश्वास ठेवणे असे आव्हान जिल्हाधिकारी एस. कीर्तीकियन यांनी केली आहे.

**आढाव बैठक**

जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी. क्ष्झउङ,इझ्झउङ ,खजउङ यातील कंपन्यांच्या डेपो व्यवस्थापक व विक्री अधिकाऱ्यांची व्हिडिओ पण परत द्वारे बैठक घेतली या बैठकीत सोलापूर जिल्ह्यातील पेट्रोल डिझेल साठा वितरण व्यवस्थेच्या सविस्तर आढावा घेण्यात आला या बैठकीस अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पाडोळी तसेच संबंधित कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते. प्रशासनाच्या सूच सूचना पेट्रोल पंप चालकाकडून इंधनाची पूर्ण देयक प्राप्त झाल्यानंतर वितरण करावे. काळाबाजार रोखण्यासाठी वाहनाशिवाय प्लास्टिक ड्रम किंवा बाटल्यांमध्ये इंधन मागणाऱ्या ग्राहकांच्या नोंदी ठेवावी.

ग्राहकांचे नाव मोबाईल क्रमांक ओळखपत्र वापरावे कारण या छायाचित्र नोंदवहीत ठेवण्याची निर्देश कृत्रिम तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी सूक्ष्म नियोजन करून नियमित पुरवठा सुरू ठेवावा साठ्यांची स्थिती,

BPCL कडे पेट्रोल व डिझेलचा सात दिवसाचा साठा,

BPCL , कडे पेट्रोल व डिझेलचा सुमारे सात दिवसाचा साठा,

खजउङ, कडे मोठ्या प्रमणात पेट्रोल व डिझेलचा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत जिल्ह्यात एकूण ४२० पेट्रोल पंप पासून सात दिवसाचा साठा उपलब्ध.

पाकणी डेपो इथे मुंबईतील रिफायनरी मधून पाईपलाईन द्वारे सतत पुरवठा सुरू.

**दररोजची गरज,**

सोलापूर जिल्ह्यात दररोज सुमारे ६२४ज्ञङ पेट्रोल व बाराशे चाळीसघङ डिझेलची आवश्यकता भासते त्यानुसार पुरेसा साठा उपलब्ध असल्याने नागरिकांनी घाबरून इंधन साठवणूक करू नये.

**इंधन बचतीची आव्हान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आव्हानाला प्रतिसाद देत प्रशासनाने दररोज किमान एक टक्का इंधन बचत करण्याची आव्हान केले आहे एकता का इंधन बचत झाल्यास दररोज २४ कोटींची बचत होऊ शकते.

# दत्ता भोंगळे यांना राज्यस्तरीय पत्रकार रत्न पुरस्कार जाहिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर तालुका मराठी पत्रकार संघाचे संस्थापक या माध्यमातून व पत्रकारिता क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने दैनिक सकाळचे जेष्ठ पत्रकार दत्ता नाना भोंगळे यांना राज्यस्तरीय पत्रकार रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. याची घोषणा धाराशिव येथे घेण्यात आलेल्या साहित्य संमेलनाच्या



आढावा बैठकीत करण्यात आली. या निवडीचे पत्र अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी दिले. सदर पुरस्काराचे वितरण २९ मे २०२६ रोजी धाराशिव येथे होणाऱ्या ३२ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात सकाळी ठीक ११ वाजता महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. ना. सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. धाराशिव येथील बैठकिस राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे, राष्ट्रीय विश्वस्त ज्ञानेश्वर पतंगे, मराठवाडा प्रदेशाध्यक्ष परमेश्वर पालकर, मराठवाडा उपाध्यक्ष तुकाराम गंगावणे आदी उपस्थिती होते.

# स्वेरीच्या तीन विद्यार्थिनींना आयट्रिपलई, डब्ल्युआयई शिष्यवृत्ती अंतर्गत लॅपटॉप प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मधील तीन विद्यार्थिनींना आयट्रिपलई, डब्ल्युआयई अर्थात ऊमेन इन इंजिनिअरिंग शिष्यवृत्ती २०२५-२६ प्रित्यर्थ क्वेस्ट् ग्लोबल यांच्या आर्थिक सहाय्याने आणि आयट्रिपलई इंडीया फिलॅन्थ्रपी यांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित उपक्रमांतर्गत लॅपटॉप प्रदान करण्यात आले.

महिलांना अभियांत्रिकी क्षेत्रात प्रोत्साहन देणे, त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची साधने उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या करिअर विकासाला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. हा लॅपटॉप वितरण समारंभ दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी पुण्यातील भारती विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग फॉर ऊमेन, पुणे येथे उत्साहात पार पडला. या शिष्यवृत्तीसाठी स्वेरीच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग मध्ये दुसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या श्रेया मुकेश लखेरी व तेजस्विनी धनाजी जाधव तसेच कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागात दुसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या तेजस्विनी कुमार यादव या तिन्ही विद्यार्थिनींना



त्यांच्या शैक्षणिक व तांत्रिक प्रगतीसाठी लॅपटॉप प्रदान करण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक डॉ.बी.पी.रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही.मांडवे, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता व आयट्रिपलई विभागाचे समन्वयक डॉ. एम. एस. मठपती, समन्वयक प्रा. स्मिता गावडे, विभागप्रमुख डॉ. नीता तळवलकर, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी तिन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. या विद्यार्थिनींच्या उल्लेखनीय यशामुळे स्वेरीच्या विद्यार्थिनींना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून, इतर विद्यार्थ्यांनाही तांत्रिक आणि व्यावसायिक प्रगतीसाठी प्रेरणा मिळणार आहे, हे मात्र नक्की. या निमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने आयट्रिपलई इंडिया फिलॅन्थ्रपी, क्वेस्ट् ग्लोबल जोसेन मार्टिन आणि अशोका व विठ्ठल यांचे आभार मानण्यात आले.

### ५०० ते ६०० शेतकऱ्यांना मिळणार दिलासा

# निफाड तालुक्यातील रुई कोळगाव येथील ३० वर्षांपासून बंद असलेला शिवरस्ता अखेर मोकळा

### ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : तालुक्यातील मौजे रुई कोळगाव येथील गेल्या ३० वर्षांपासून अतिक्रमणाच्या विळख्यात बंद असलेला महत्त्वाचा शिवरस्ता अखेर प्रशासनाच्या वतीने यशस्वीरीत्या खुला करण्यात आला आहे. पोलीस बंदोबस्तात दोन किलोमीटर लांबीचा आणि १२ फूट रुंदीचा हा रस्ता मोकळा करण्यात आल्याने परिसरातील अंदाजे ५०० ते ६०० शेतकऱ्यांचा दळणवळणाचा मोठा प्रश्न सुटला आहे.

या रस्त्याबाबत प्रशासनाने आज, दिनांक १९ मे २०२६ रोजीची तारीख निश्चित केली होती. त्यानुसार संबंधित गटातील शेतकऱ्यांना रस्ता खुला करण्याबाबत पूर्वकल्पना देऊन नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. आज सकाळी ठीक ११ वाजता प्रत्यक्ष जागेवर रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची आणि रस्ता खुला करण्याची प्रशासकीय कार्यवाही सुरू करण्यात आली.






**शेतकऱ्यांशी संवाद आणि सामोपचार**

कारवाईची सुरुवात करण्यापूर्वी उपस्थित सर्व शेतकऱ्यांची एक बैठक घेण्यात आली. या बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांनी सर्व शेतकऱ्यांना या शिवरस्त्याचे महत्त्व आणि त्याची निकड पटवून दिली. ३० वर्षांपासून हा रस्ता बंद असल्याने शेतकऱ्यांना शेतमाल ने-आण करण्यासाठी किती अडचणी येत होत्या, याबाबतही चर्चा झाली. प्रशासनाच्या सकारात्मक आवाहनाला शेतकऱ्यांनीही उत्तम प्रतिसाद दिला.

**भूमी अभिलेख व पोलीस प्रशासनाची महत्त्वाची भूमिका**

बैठकीनंतर जागेवर उपस्थित असलेल्या भूमी अभिलेख विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सर्व शेतकऱ्यांच्या समक्ष रस्त्याच्या शासकीय हद्दी व खुणा निश्चित केल्या. शेतकऱ्यांच्या संमतीने आणि कायदेशीर प्रक्रियेचा आदर करत, कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी तैनात करण्यात आलेल्या चोख पोलीस बंदोबस्तात हे २ किलोमीटरचे अतिक्रमण काढण्यात आले.

हा रस्ता खुला झाल्यामुळे आता परिसरातील शेकडो शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाणे आणि शेतमाल बाजारपेठेपर्यंत पोहोचवणे अत्यंत सोपे होणार आहे. ३० वर्षांनंतर हक्काचा रस्ता मोकळा झाल्याने रुई कोळगाव परिसरातील शेतकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानले असून समाधान व्यक्त केले आहे.

# टाकळीवाडी परिसरातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ परिसरात सध्या पावसाने अद्याप हजेरी लावलेली नसल्याने शेतकरी वर्ग चिंतेत पडला आहे. खरीप हंगामाची तयारी पूर्ण झाली असली तरी पावसाअभावी शेतकऱ्यांना पेरणी करता येत नसल्याने शेतात ओसाड वातावरण दिसून येत आहे.

अनेक शेतकऱ्यांनी शेती मशागत, खतांची खरेदी तसेच बियाण्यांची तयारी करून ठेवली आहे. मात्र आकाशात ढगांची ये-जा सुरू असली तरी अद्याप समाधानकारक पाऊस पडलेला नाही. त्यामुळे पिकांच्या नियोजनावर परिणाम होत असून शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

परिसरातील काही ठिकाणी उष्णतेचे प्रमाण वाढल्याने जनावरे व नागरिकही त्रस्त झाले आहेत. वेळेत पाऊस झाला तरच खरीप हंगाम चांगला जाईल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. सध्या सर्वांचे लक्ष आकाशाकडे लागून राहिले असून लवकरच दमदार पाऊस पडावा, अशी प्रार्थना शेतकरी वर्गातून केली जात आहे.

# ६० वर्षांपासून बंद असलेला खेडलेझुंगे येथील १ किमीचा रस्ता अखेर खुला!




## शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण; प्रशासनाचे मानले आभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : तालुक्यातील खेडलेझुंगे येथील गेल्या ६० वर्षांपासून बंद असलेला सुमारे १ किलोमीटर लांबीचा आणि १२ फूट रुंदीचा म हत्त्वाचा शेतरस्ता अखेर प्रशासनाच्या यशस्वी मध्यस्थीने आणि लोकसम जुतीने मोकळा करण्यात आला आहे. रस्ता खुला झाल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचा मोठा प्रश्न सुटला असून, सर्व शेतकऱ्यांनी प्रशासनाचे मनापासून आभार मानले आहेत.





**अशी झाली प्रशासकीय कारवाई:**

खेडलेझुंगे गावातील गट नंबर १८ मधून पुढे गट नंबर ८३ पर्यंत जाणारा गाव नकाशामध्ये तुटक रे-षेने दाखवलेला रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून वादाच्या भोवऱ्यात अडकला होता. हा रस्ता मोकळा करण्यासाठी निफाडचे उपविभागीय अधिकारी शशिकांत मंगरूळे तहसीलदार विशाल नाईकवाडे,भूमी अभिलेख उपअधिक्षक राजेंद्र भाबड. यांनी आदेश दिले होते.

या कामी शरद घाडगे व मच्छिंद्र बारस्कर यांचे विशेष सहकार्य लाभले.

या आदेशानुसार दि. २०/०५/२०२६ रोजी देवगावचे मंडळ अधिकारी जयंत लिलके यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून शेतकऱ्यांना रस्त्याचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर निमतानदार रुपेश पाटील यांनी मोजणी करून दाखवलेल्या हद्दीच्या खुणांनुसार, कोणत्याही वादाशिवाय लोकसमजुतीने हा १ किलोमीटरचा रस्ता पूर्णपणे खुला करण्यात आला.

**यांचे लाभले सहकार्य:**

हा जुना रस्ता कायदेशीर व शांततापूर्ण मार्गाने मोकळा करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी दिपक पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक पाटील साहेब, पोलीस कॉन्स्टेबल संदीप जाधव, पोलीस पाटील जयराम सोनावणे, तंटामुक्ती अध्यक्ष मच्छिंद्र साबळे आणि ग्रामपंचायत कर्मचारी योगेश तस्कर यांनी घटनास्थळी उप-स्थित राहून चोख सहकार्य केले.

**६० वर्षांनंतर शेतकऱ्यांना दिल-ासा:**

रस्ता खुला होत असताना परिसरातील लाभार्थी शेतकरी सर्वश्री जनार्दन पाटील, दीपक पाटील, रवींद्र घोटेकर, दत्तात्रय घोटेकर, भागवत घोटेकर, बबनराव घोटेकर, राजेंद्र घोटेकर, सुनील घोटेकर, नारायण घोटेकर, दत्ताभाऊ घोटेकर, केदारनाथ हगोटे, पांडुरंग घोटेकर, ज्ञानेश्वर घोटेकर आदींसह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तब्बल सहा दशकांचा जुना प्रश्न सुटल्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी अत्यंत समाधान व्यक्त करत निफाड महसूल व पोलीस प्रशासनाचे जाहीर आभार मानले आहेत.

## कळंब येथील धनंजय ताटें यांची आधुनिक लहुजी सेनेच्या धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब शहरातील धडाडीचे युवा सामाजिक कार्यकर्ते धनंजय ताटे यांची आधुनिक लहुजी सेना या संघटनेच्या धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी नुकतीच एका कार्यक्रमात नियुक्ती करण्यात आली आहे.

आधुनिक लहुजी सेनेच्या संस्थापिका आदरणीय नगीना-ताई कांबळे यांनी धनंजय ताटे यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. समाजकार्य आणि संघटनात्मक कामातील त्यांच्या सक्रियतेमुळे ही जबाबदारी त्यांना देण्यात आल्याचं संघटनेतर्फे सांगण्यात आलं.

नियुक्तीनंतर बोल-ताना धनंजय ताटे म्हणाले की, आधुनिक लहुजी सेना ही छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळ-वे, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, महात्मा जोतिबा फुले तसेच इतर सर्व महामानवांच्या विचारांवर चालणारी संघटना आहे. संस्थापिका नगीनाताई कांबळे, आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी म ाझ्यावर टाकलेली जबाबदारी मी निष्ठेने पार पाडेन. असे म्हटले आहे.

धनंजय ताटे यांच्या नियुक्तीचे कळंब शहरासह तालुक्यात आणि धाराशिव जिल्ह्यात सर्वत्र स्वागत होत असून कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## उगाव शाळेतील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :

निफाड प्रतिनिधी : महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय, उगाव येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ५ वी मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले असून. विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे,


या परीक्षेत विद्यालयातील आरव गणेश मेधने यांने ७५.३३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तर तेजश्री भाऊसाहेब महाले हिने ५२.०० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर तेजस्विनी दत्तात्रय ताजने हिने ४६.६६ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव (आण्णा) जोंधळे, ज्येष्ठ म ार्गदर्शक दीपकभाऊ जोंधळे, सचिव दत्ताभाऊ जोंधळे, विनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकर आप्पा ढोमसे, उपाध्यक्ष साहेबराव आबा ढोमसे, विद्यालयाचे प्राचार्य कैलास गवळी व पर्यवेक्षक नंदाराम ढिकले* यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत तसेच शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांना योगेश गवळी, श्रीमती सुनीता वाबळे श्रीमती वनिता भारमल आणि शितल आहेर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

वरील पात्र विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे मनः पूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छ देण्यात आल्या

# गुरसाळे येथील अवैध वाळू उपशावर कारवाई, जेसीबी, टिपूर, ट्रॅक्टर व दुचाकी जप्त, दोघांवर गुन्हा दाखल







पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे मुलाज-वळ बुधवारी पहाटे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या टीमने कारवाई केली या कारवाईमध्ये अवैध वाळू उपचार करत असताना आढळून आले असल्याने पोलिसांनी जेसीबी टिप्पर ट्रॅक्टर व दुचाकी २५ ब्रास वाळू जप्त केली आहे याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे या घटनेमुळे अवैध उपसा करणारे जे धावे दणाणले असल्याचे दिसून येत आहे.

पंढरपूर शहर व तालुक्यातील मोठ्या प्रमाणात विविध वाळू उपसा केला जातो मात्र याकडे महसूल विभागाचे लक्षण असल्याचे दिसून येत आहे. चाप लावला जात नाही.

रसाळ येथे पुलाजवळ म ोठ्या प्रमाणावर अवैध उपचार केला जातो मात्र याकडे पंढरपूर विभागातील अधिकाऱ्यांचे अर्थपूर्ण संबंध असल्यामुळे वाळू उपशाला चाप लावला जात नाही.

पंढरपूर तालुक्यातील गुरस-ाळे येथील तुला जवळ मोठ्या प्रमाणावर विविध वाळू उपसा केला जात आहे अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी यांना मिळाली व त्यांनी बुधव-ारी पहाटे आपले सहकारी व पोलीस हेड कॉन्स्टेबल सुरज हेंबाडे, शिवानंद हुलजंती निलेश रोंगे, यांना बरोबर घेऊन त्यांच्यावर कारवाई केली. कारवाई मध्ये अवैध उपचार होत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी टिपर ट्रॅक्टर, सह पंचवीस ब्रास वाळू व दुचाकी वाहन लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी दोघाविरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे वाळू उपसा करणाऱ्या चे दाबे दणाणले आहेत.

## कळंब बस आगारात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : शिवजन्म उत्सव समिती, कळंब यांच्या पुढाकाराने कळंब बस आग-ारातील एसटी कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार सोहळा मंगळवारी दि. २० रोजी कळंब बस आगारात उत्साहात पार पडला.

कळंब बस आगारा-तील वाहक, चालक आणि यांत्रिक कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी यंदाच्या १०वी व १२वी परी-क्षेत ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उल्लेखनीय यश मि ळवले. या यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

आगार प्रमुख विजयकुमार घोलप यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक आणि रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजयकुमार घोलप होते. प्रमुख पाहुणे म्हणून कार्यशाळा अधीक्षक अभिजीत कवडे आणि कळंब तालुका मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष विलास मुळीक उप-स्थित होते.

व्यासपीठावर वाहतूक नियंत्रक सुशील हुंबे, नामदेव जागताप आणि गोविंद जाधवर यांच्यासह आगारातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सत्कारमूर्ती विद्यार्थ्यांमध्ये १०वीतील प्रार्थ भिसे हिने ९७.६० टक्के गुण मिळवून आगारात प्रथम क्रमांक पटकावला. प्रांजल चौधरी ९४.८० टक्के, श्री जाधवर ९४.४० टक्के, यश्री भिसे ९१.४० टक्के, स्मि ता घेवारे ८९ टक्के, समुद्धी ओव्ह-ाळ ८५.२० टक्के, प्रज्ञा जाधव ८४ टक्के, अमर कुचेकर ८१.५० टक्के, अजय औसेकर ८१.१७ टक्के, विराज गायकवाड ८०.२० टक्के, अक्षरा भांगे ७८.२० टक्के आणि आकांक्षा शिंदे ७६.६० टक्के गुणांसह यशस्वी झाल्या.

याशिवाय वैष्णवी थोरात ८२ टक्के, माऊली पवार ७.३ टक्के, म ानसी मुळीक ७६.६७ टक्के आणि प्रथमेश गोरे ७६ टक्के गुणांसह गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन गणेश गोरे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल उपस्थित मान्यवरांनी कौतुक करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शिवजयंती उत्सव समिती आणि कळंब बस आग-ारातील कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.

**विश्व फाउंडेशन व दैनिक लोकनेता परिवाराच्या संयुक्त विद्यमानाने सामाजिक उपक्रम**

# सावखेड तेजनमध्ये 'हयात प्रमाणपत्र' शिबिर; वृद्ध, निराधारांना गावातच मिळाली मोफत सेवा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : तालुक्यातील सावखेड तेजन येथे दैनिक लोकनेता परिवाराच्या वती-ने तसेच विश्व फाउंडेशनच्या नियोजनातून श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योज-नेतील लाभार्थ्यांसाठी मोफत 'हयात प्रमाणपत्र' (डळषश उर्शीींळषळलरींश) शिबिराचे आयोजन करण्यात आले हो-ते.. ग्रामीण भागातील वृद्ध, विधवा, परित्यक्ता तसेच दिव्यांग नागरिकांना शासकीय प्रक्रियेसाठी होणारी धावपळ थांबविणे आणि आर्थिक फसवणुकीपासून त्यांचे संरक्षण करणे हा या सामाजिक उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.



सिंदखेड राजाचे तहसीलदार अजित दिवटे यांनी लाभार्थ्यांना गावपातळीवर सुविधा उपलब्ध करून देण्याचे केलेले आवाहन लक्षात घेऊन दैनिक लोकनेता परिवार आणि विश्व फाउंडेशनने संयुक्तपणे हा लोकाभिमुख उपक्रम हाती घेतला आहे. आ-पली सेवा, हीच आमची आ-ओळख तसेच आपलं गाव, आ-पली जबाबदारी या सामाजिक भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे परिसरात मोठ्या प्रमाणात स्वागत झाले.

श्रावणबाळ, संजय गांधी निराधार तसेच इतर सामाजिक सुरक्षा योजनांतील लाभार्थ्यांना दरवर्षी हयात प्रमाणपत्रासाठी विविध कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागतात. अनेक वृद्ध व दिव्यांग नागरिकांना प्रवासा-चा त्रास सहन करावा लागतो. काही वेळा एजंट किंवा खासगी केंद्रांमार्फत आर्थिक फसवणूक होत असल्याच्या तक्रारीही पुढे येतात. हीच बाब लक्षात घेऊन गावातच मोफत सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत तसेच आकाश गायकवाड आणि विशाल ढाकणे यांनी लाभार्थ्यांचे हयात प्रमाणपत्र काढण्यासाठी विशेष सहकार्य केले आहे. लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, ऑनलाइन प्रक्रिया तसेच म ार्गदर्शन करून त्यांना तत्काळ सेवा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

हे शिबिर सावखेड तेजन येथील आईचे मंदिर येथे शनिवार व रविवार या दोन दिवसांत सकाळी ९ ते दुपारी ११ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले होते. लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह, विशेषतः आधार कार्ड घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले होते.

> **'हयात प्रमाणपत्र' काढण्यासाठी येरझारा घालने व नागरिकांची आर्थिकलूट ही बाब लक्षात घेऊन विश्व फाउंडेशन व दैनिक लोकनेता परिवाराने हा सामाजिक उपक्रम राबवला, नागरिकांनी या उपक्रमाला प्रतिसाद दिला. सावखेड तेजन येथील याच उपक्रमाची दखल घेत तालुक्यातील इतर ठिकाणी देखील अशा प्रकारे शिबिर आयोजित करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. विश्व फाउंडेशन व दैनिक लोकनेता परिवार यांच्या वतीने तालुकाभर असे उपक्रम राबवणार येणार आहे.**
>
> **– ज्ञानेश्वर बुधवत**
> **अध्यक्ष विश्व फाउंडेशन**

विश्व फाउंडेशनच्या नियोजनामुळे शिबिराचे व्यवस्थापन अधिक सुलभ व शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. लाभार्थ्यांना तत्काळ सेवा देण्यावर भर दिला गेला. गावपातळीवर अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे सामाजिक योजनांचा लाभ थेट गरजूंपर्यंत पोहोचण्यास मदत होत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

या उपक्रमामुळे गावा-तील ज्येष्ठ नागरिक, महिला व दिव्यांगांना मोठा दिलासा मिळाला असून सामाजिक बांधिलकी जपत लोकाभिमुख कार्य करण्याचा आदर्श दैनिक लोकनेता परिवार आणि विश्व फाउंडेशनने निर्माण केल्याची प्रतिक्रिया परिसरातून उमटत आहे.